नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील शासकीय/निमशासकीय इत्यादि कर्मचाऱ्यांच्या/ अधिकाऱ्यांच्या प्रशासनिक व सेवाविषयक तक्रारीचे निवारण

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्र.आस्था-१००१/प्र.क्र.४/का.१५
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ६ फेब्रुवारी,२००१

शासन निर्णय :-

नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या हेतूने मध्यंतरी मा.मुख्यमंत्री महोदयांनी विविध विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती व त्यामध्ये विविध समस्यांचे निराकरण करण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आदेश दिलेले होते. या पार्श्वभूमीत केवळ गडचिरोली जिल्हयातील विविध विभागातील शासकीय कर्मचारी / अधिकारी तसेच निमशासकीय अधिकारी / कर्मचारी, विविध महामंडळे, स्थानिक प्राधिकरणे व शासकीय उपक्रमातील तसेच विविध मंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्या अनेक प्रशासनिक व सेवाविषयक अडीअडचणी/तक्रारींचे निवारण योग्य रितीने व सत्वर होत नाही अशी बाब लक्षात आली. ही बाब लक्षात घेऊन आता यावर उपाय म्हणून केवळ नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयामध्ये कार्यरत असलेल्या अशा शासकीय / निमशासकीय इत्यादि अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रशासनिक व सेवाविषयक अडचणी सत्वरतेने दूर करण्याच्या हेतूने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरिय तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

२. उक्त समितीची रचना खालीलप्रमाणे राहील --

| | | |
|---|---|---|
| (१) | मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| (२) | अपर मुख्य सचिव (सेवा),सा.प्र.वि. | सदस्य |
| (३) | अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग | सदस्य |
| (४) | प्रधान सचिव (वने) महसूल व वन विभाग | सदस्य |
| (५) | सचिव (रस्ते) सा.बां.वि. | सदस्य |
| (६) | सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| (७) | सचिव, आदिवासी विकास | सदस्य |
| (८) | विभागीय आयुक्त, नागपूर | सदस्य सचिव |

३. उक्त समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील --

गडचिरोली जिल्हयात कार्यरत असलेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी / निमशासकीय अधिकारी/कर्मचारी / शासकीय महामंडळे/स्वायत्त प्राधिकरणे / मंडळे शासकीय उपक्रमातील कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या केवळ प्रशासनविषयक अडीअडचणींचा विचार उक्त समिती करेल. तसेच ज्या कर्मचाऱ्यांच्या गडचिरोली जिल्हयातील स्थानापन्नतेमुळे काही समस्या उद्‌भवल्या असल्यास अशा समस्यांचांही विचार उक्त समिती करेल.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
13 FEB 2001

४. उक्त समितीची कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे राहील --

(अ) गडचिरोली जिल्हयात कार्यरत असलेल्या शासकीय/निमशासकीय इत्यादि अधिकारी / कर्मचारी त्यांच्या नेमक्या तक्रारीबाबत / अडीअडचणींबाबतचा अर्ज / निवेदन संबंधित कार्यालय प्रमुखांमार्फत विभागीय आयुक्त,नागपूर यांच्याकडे पाठवतील. कार्यालय प्रमुख सदर अर्ज / निवेदने आपल्या अभिप्रायासह विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे पाठवतील. या तक्रारअर्जाला / निवेदनाला विभागीय आयुक्त,नागपूर हे आठ दिवसात लेखी पोच देतील.

(ब) तक्रारदाराला पोच दिल्यानंतर विभागीय आयुक्त हे सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये अशा अर्जाची / तक्रारीची वा निवेदनाची नोंद करील आणि तक्रार नोंदल्यानंतर ३० दिवसाच्या आत अशा तक्रारीचे निवारण करुन तक्रारदारास तसेच त्याच्या कार्यालय प्रमुखास लेखी उत्तर देतील.

(क) विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या तक्रार निवारण कार्यवाहीबाबत तक्रारदाराचे समाधान न झाल्यास त्या तक्रारदाराने विभागीय आयुक्तांचे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विभागीय आयुक्त, नागपूर यांचेमार्फत उक्त समितीकडे तक्रार केल्यास किंवा विभागीय आयुक्त, नागपूर हे तक्रारदाराची मूळ तक्रार ३० दिवसाच्या विहित काळात निवारण करु शकत नसल्यास ते अशी प्रकरणे वर उल्लेख केलेल्या समितीकडे आपल्या अभिप्रायासह विचारार्थ सादर करतील.

(ड) वर उल्लेख केलेल्या समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा आयोजित केली जाईल.

(इ) उक्त समितीला आवश्यक वाटल्यास सदर समिती तक्रारदाराच्या विभाग प्रमुखांचे/ प्रशासकीय विभागांचे अभिप्राय/मत मागविल किंवा विभाग प्रमुखांना/प्रशासकीय विभागाच्या सचिवांना बैठकीस पाचारण करण्याचे आदेश देईल.

(ई) आवश्यक वाटल्यास उक्त समिती तक्रारदाराला आपले म्हणणे समितीसमोर समक्ष मांडण्याची संधी अपवादात्मक परिस्थितीत देवू शकेल.

(फ) उक्त समितीने दिलेले निदेश व निर्णय अंतिम स्वरुपाचे राहतील.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व मा.मुख्यसचिव यांच्या आदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(आर. सी. जोशी)
सचिव,
आदिवासी विकास

प्रति,
मा.मुख्य सचिव